RNI No. MAHENG /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक २०] सोमवार, मार्च ३०, २०२६/चैत्र ९, शके १९४८ [पृष्ठे ३ , किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक २९

प्राधिकृत प्रकाशन

सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वसई यांजकडून

दिवा-वसई सेक्शन टिवरी रोड येथे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकामाकरिता भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम ११(१) खालील

प्राथमिक अधिसूचना

क्रमांक व्हीडी/टे-२/एल.सी.-१०/भूसंपादन/कावि-४९.— ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वनविभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/ प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या **अनुसूची एक** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश 'उक्त जमीन' करण्यात आला आहे). सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश 'सार्वजनिक प्रयोजनासाठी' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या **अनुसूची दोनमध्ये** दिलेली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींमध्ये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येत की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या **अनुसूची तीन** मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या **अनुसूची चार** मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या **अनुसूची पाच** मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४अ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, सक्षम प्राधिकारीस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त मालकास तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची सक्षम प्राधिकारीकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार सक्षम प्राधिकारी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमाखालील, जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, वसई यांस पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची -एक

जमिनीचे वर्णन

(अ) गाव टिवरी, ता. वसई, जि. पालघर

भूसंपादन प्रकरण ०१/२०२६

अ.क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	संपादित क्षेत्र (हे.आर.मध्ये)
१.	४७/१	०.०३.८९
२.	४७/२	०.०१.६७
३.	४८/४	०.०४.०८
४.	४८/५	०.०४.१९
५.	४८/७	०.०७.४६
६.	५०/२	०.०२.५७
७.	५०/३	०.०५.८४
८.	५०/४	०.०४.४७
९.	५०/५	०.०३.२२
१०.	७१	०.०७.२१
११.	७२	०.००.७०
एकूण		**०.४५.३०**

अनुसूची -दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :— दिवा-वसई सेक्शन टिवरी रोड रेल्वे उड्डाण पूल बांधकाम प्रकल्प

प्रकल्पकार्याचे वर्णन :— दिवा-वसई सेक्शन टिवरी रोड रेल्वे उड्डाण पूल बांधकाम प्रकल्प

समाजाला मिळणारे लाभ :— पालघर जिल्ह्यामधील वसई तालुक्यातील रेल्वे उड्डाणपुलामुळे रेल्वे क्रॉसिंगच्या वेळेस होणारी वाहतूक कोंडीची समस्या सुटणार आहे. स्वतंत्र रेल्वे उड्डाणपुलामुळे वारंवार बंद होणाऱ्या रेल्वे फाटकाची समस्या सुटणार आहे.

स्थानिक लोकांच्या रहदारीची समस्या सुटेल तसेच शहराच्या पूर्व आणि पश्चिम बाजूस जाणेकामीचा प्रवास जलद व सुखकर होईल. तसेच त्या प्रकल्पामुळे प्रवासी वाहतुकीत वाढ, सुरक्षित आणि जलद प्रवास, भौगोलिक आणि सामाजिक दृष्टीने सर्वंकष विकास, पर्यावरण स्थिरता ह्या बाबी अभिप्रेत आहेत.

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे — विस्थापित होत नाहीत कारणेः निरंक

अनुसूची — चार

सामाजिक परिणाम निर्धारणांचा सारांश :— निरंक
(सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास संस्थेद्वारे दिलेल्या माहितीनुसार)

अनुसूची — पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांचे पदनाम — उपविभागीय अधिकारी, वसई

ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता — श्रीप्रस्थ, नालासोपारा-विरार लिंक रोड, निळेमोरे, नालासोपारा (प.), ता. वसई, जि. पालघर, पिन.नं. ४०१ २०३

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाचे नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचे विस्तृत विवरण

(निर्गमित करण्यापूर्वी भरावे) — मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडील दि. २४/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये नियुक्ती.

टीप — सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कलम ११ (१) उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वसई यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल, तसेच उक्त जमिनीच्या आराखड्याचे निरीक्षण करता येईल.

वसई,
दिनांक २७/३/२०२६.

शेखर घाडगे,
सक्षम प्राधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, वसई,
खोलसापाडा—१ लघु पाटबंधारे योजना प्रकल्प.

डॉ. इंदु राणी जाखड़,
जिल्हाधिकारी, पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.